SYBA - Marathi II September & October Lib
III Sem
Regu- Exam NO1OAEC 25/9/14

वेळ २ १/२ तास गुण ७५

---

१ 'कादंबरी' या साहित्य प्रकाराचे घटक कोणते ते सांगून कादंबरीत पात्रचित्रण हा घटक कितपत महत्त्वाचा ठरतो ते सांगा. (१५)

किंवा

'कादंबरी' या साहित्य प्रकाराच्या व्याख्या सांगून कादंबरीतील कोणत्याही दोन घटकांची चर्चा करा.

२ "'गोतावळा' ही गुराढोरांवर प्राणापलिकडे प्रेम करणा-या नारबाच्या उध्वस्त भावविश्वाची करूण गंभीर कहानी आहे" साधार स्पष्ट करा. (१५)

किंवा

"'गोतावळा' या कादंबरीतील ग्रामीण बोली मुक्या प्राण्यांना बोलके करण्यात यशस्वी झाली आहे" साधार विशद करा.

३ "सैनिकी जीवन आणि समाज जीवन यातील आंतर्विरोधाचे भेदक दर्शन 'रोबो ' कादंबरीतून घडते" या विधानाची सोदाहरण चिकित्सा करा. (१५)

किंवा

"समाजाला आव्हान देऊ पाहणारी, 'रोबो 'होणे नाकारणारी व्यक्ती 'रोबो ' कादंबरीच्या नायकामधून साकार झाली आहे." साधार भाष्य करा.

४ टीपा लिहा. (१५)

(अ) कथानक - कादंबरीचा एक घटक

किंवा

कादंबरीतील निवेदन

(ब) 'गोतावळा' कादंबरीतील संघर्ष

किंवा

'गोतावळा' कादंबरीतील यंत्रनिष्ठ संस्कृती

(क) 'रोबो ' कादंबरीचा नायक डिकी

किंवा

शेखूचे सैनिकी जीवनावरील भाष्य.

NOIOAEC

५ अ. पुढीलपैकी कोणत्याही ५ प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (१०)

(अ) शेती फायदेशीर ठरावी म्हणून मालक काय आणण्यासाठी धडपडतो?

(ब) 'गोतावळा' ही कादंबरी कधी प्रकाशित झाली?

(क) 'गोतावळा' या कादंबरीतील कुत्रीचे नाव काय आहे?

(ड) 'गोतावळा' कादंबरीतील मालक नारबाला कशाची लालूच दाखवतो?

(प) 'रोबो ' कादंबरी कोणत्या विषयाशी संबंधीत आहे?

(फ) शेखू डिकीला काय सांगतो?

(ब) सुनीता कोणत्या प्रांतातून आलेली असते?

(भ) प्रभाची बदली कोठे झाली?

५ ब. पुढील पर्यायापैकी एक योग्य पर्याय निवडा (५)

(१) कादंबरीच्या प्रारंभापासून अखेर पर्यंत कशाची व्याप्ती असते?

(क) कथानक (ख) पात्रे (ग) घटना

(२) कादंबरीतील कथानक कुठे घडते?

(च) कुठल्यातरी शहरात (छ) कुठल्यातरी गावात (ज) कुठल्यातरी वातावरणात

(३) कथानकाचा अत्यंत लहान घटक कोणता असतो?

(त) घटना (थ) पात्रे (द) निवेदक

(४) कादंबरीतील कथानकात कशाच्या कार्यकारण संबंधाला महत्त्व असते?

(ट) घटनांच्या (ठ) पात्रांच्या (ड) वातावरणाच्या

(५) कादंबरीची रचना कशाच्या रचनेसारखी असते?

(प) संघराज्याच्या (फ) लोकसभेच्या (ब) राज्यसभेच्या